राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प NCPL अंतर्गत करण्यात आलेल्या सुधारणांनुसार, राज्यसंसाधन केंद्र (State Resource Centre) स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. : सीएलए- २०१७/ प्र.क्र. २९४/ कामगार-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०१८

संदर्भ :-

१) केंद्र शासनाचे क्र. F.No. G-२००१३/ १/२०१२-CL, दिनांक ३१/१०/२०१७ चे कार्यालयीन ज्ञापन.
२) केंद्र शासनाचे क्र. S-२७०१९/१/२०१८-CL, दि.०७/०२/२०१८ चे अ.शा. पत्र.

प्रस्तावना :-

बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा, कायदा २०१६ च्या सुरळीत अंमलबजावणी करीता व राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या (NCLP) परिणामकारक अंमलबजावणी करीता केंद्र शासनाने दि.२६.०९.२०१७ रोजी PENCIL पोर्टल स्थापन केले आहे, व त्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून एक नोडल अधिकारी नेमण्यात आला आहे.

संदर्भाधीन अ.क्र. १ येथील केंद्र शासनाच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये करण्यात आलेल्या सुधारणानुसार राज्यात NCLP च्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी राज्यात संसाधन केंद्र (State Resource Centre) स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती.

केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालयाने त्यांच्या दि.२४.०१.२०१७ च्या अधिसूचनेअन्वये (Central Advisory Board) (CAB) पुर्नस्थापित केले असून State Resource Centre (SRC) ने सदर Central Advisory Board च्या सूचनांना प्राधान्य देण्याचे केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र.२ येथील पत्रान्वये निर्देशित केले आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन अ.क्र.१ येथील ज्ञापनातील निर्देशानुसार पुढील प्रमाणे राज्य संसाधन केंद्र (SRC) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

आयुक्त (कामगार), कामगार आयुक्तालय, कामगार भवन, बांद्रा (पू), मुंबई-५१, यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे State Resource Centre (SRC) (राज्य संसाधन केंद्र) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

१) आयुक्त (कामगार), कामगार आयुक्तालय, मुंबई	अध्यक्ष
२) सहसचिव / उपसचिव (कामगार-४), उ.ऊ. व का. विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
३) उपायुक्त (बाल कामगार), कामगार आयुक्तालय, मुंबई	सदस्य सचिव

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील कार्यालयीन ज्ञापनान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य संसाधन केंद्राने त्यांची कार्ये पार पाडावयाची आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१९१६०९४७८२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.05.19 16:10:35 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव

प्रति,

महासंचालक, प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना सदर शासन निर्णयास व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.

प्रतिलिपी :-

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
२. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४. प्रधान सचिव,(कामगार) उद्योग, ऊर्जा व कामगार, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. आयुक्त (कामगार), कामगार आयुक्तालय, बांद्रा (पू), मुंबई-५१.
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. आयुक्त (महिला व बालकल्याण), मुंबई.
११. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
१३. मंत्रालयीन सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवडनस्ती (कामगार-४)